Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
VOL- IX ISSUE- III MARCH 2022 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 7.331 ISSN 2349-638x

# सहल अध्यापन पद्धती व गुणवत्ता विकास

डॉ. श्रीमती शिरढोणकर पी.एल.[१] आशालता ज. होळकर[२]
[१]प्राचार्या,के.पी. अध्यापक महाविद्यालय, पाचपिंपळी
[२]पीएच.डी. संशोधक विद्यार्थी

**प्रस्तावना :**

शैक्षणिक उद्दिष्ट्ये सहजतेणे साध्य करण्यसाठी दैनंदिन अध्ययन-अध्यापन प्रक्रियेमध्ये शिक्षक-विद्यार्थी, विद्यार्थी-विद्यार्थी, विद्यार्थी-परिसर यांच्यात आंतरक्रिया घडून येतात. या आंतरक्रिया गुणवत्तापुर्ण शिक्षणासाठी अत्यंत महत्वाच्या असतात.

डॉ. बश्रुम यांच्या मते, “वातावरण व्यक्तीवर परिणाम करून त्याला घडविण्याचे कार्य करते”.

म्हणजे व्यक्तीचा ज्या कोणत्या वातावरणामध्ये, परिसरामध्ये अधिवास आहे. त्या वातावरणाचा, परिसराचा परिणाम त्या व्यक्तीच्या शारिरीक, मानसिक आणि भावनिक विकासावर होत असतो. त्यामुळे ती व्यक्ती घडत असते.

कार्यवादाचे प्रवर्तक जॉनड्युई यांच्या मते, “विद्यार्थ्याचे अध्ययन त्यास प्राप्त शैक्षणिक अनुभवानुसार होते व शैक्षणिक अनुभवांची गुणवत्ता वातावरणावर अवलंबुन असते”.

म्हणजे विद्यार्थ्याला प्राप्त होणाऱ्या शैक्षणिक अनुभवानुसार त्याचे अध्ययन होते आणि त्या विद्यार्थ्याला हे शैक्षणिक अनुभव ज्या वातावरणामध्ये मिळतात त्यावर त्या शैक्षणिक अनुभवांची गुणवत्ता अवलंबुन असते.

या आंतरक्रिया प्रभावी, परिणामकारक व योग्यरितीने होण्यासाठी सांघिक वृत्ती, वैयक्तिक विकास, आज्ञापालन, शिस्त, खिलाडुवृत्ती, शारिरीक क्षमता व वैयक्तिक विकास मानसिक ताणतणाव व्यवस्थापन कौशल्याचा विकास आणि पोषक वातावरण विद्यार्थ्याला सहल अध्यापनातुन मिळतो.

**सहलीद्वारे वैयक्तिक विकास:**

‘शारिरीक, बौद्धिक, भावनिक व सामाजिक विकासातून व्यक्तीच्या व्यक्तिमत्वाचा सर्वांगिण विकास’ हे शिक्षणाचे उद्दिष्ट आहे. एखादा घटकाचे चार भिंतीमध्ये अध्यापन करण्यापेक्षा प्रत्यक्ष त्या क्षेत्रावर नेवून केले तर तो घटक विद्यार्थ्याच्या कायम स्मरणात राहण्यास मदत होते. या उद्देशाने शाळांमध्ये अभ्यास सहलींचे आयोजन केले जाते. कारण आजच्या माहिती तंत्रज्ञान आणि बहु-माध्यमांच्या युगामध्ये पाठ्यपुस्तकातील वर्णन प्रत्यक्ष डोळ्यांनी पहायला, अनुभवायला मिळाले तर विद्यार्थाची आकलन शक्ती वाढण्यास मदतच होते. तसेच शब्दातुन व्यक्त करण्याची क्षमता वाढते. विद्यार्थ्यांना जंगले पर्वत इत्यादी ठिकाणी सहलीसाठी नेले जाते. अशा सहलींची योजनाबद्ध आखणी आणि नियोजन केले जाते. त्यासाठी विद्यार्थ्यांच्या शिक्षणात इतिहास, भूगोल, भु-रचना, वन्यजीव इत्यादींचे प्रत्यक्ष ज्ञान सहलीद्वारे मिळवण्यावर भर दिला जातो. पायी चालणे, डोंगर चढणे अशा कृतीमुळे विद्यार्थी शारिरीकदृष्ट्या सक्षम आणि सुदृढ बनतात.

विशिष्ट हेतू, उद्दिष्ट, उपयुक्तता या बाबी विचारात घेवून सहलींचे आयोजन केले पाहिजे. त्यासाठी पूर्वतयारी आवश्यक असते. सहलीत सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांनी कोणकोणत्या स्थळांना भेटी द्यायच्या आहेत, तिथे काय-काय पाहायचे आहे, कोणकोणती माहिती मिळवायची, कोणती टिपणे घ्यायची या सगळ्यांची पूर्वसूचना द्यावी. कोणत्या वस्तू बरोबर घ्याव्यात. विविध स्थळांची ऐतिहासिक, भौगोलिक, पुरातत्वीय, कला व सौंदर्यात्मक वैशिष्टे तसेच अन्य महत्वाची माहिती त्यामुळे विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पडते. प्रत्यक्ष निरीक्षणातून वेगवेगळ्या विषयातील ज्ञान वाढीस लागते आणि अशा अभ्यासाबाबत त्या त्या विषयात रस निर्माण व्हायला मदत होते.

शिक्षणाच्या विविध अध्यापन पद्धतीमधे भूगोलाच्या अध्यापनात सहल अध्यापन पद्धतीस विशेष महत्व आहे. सहल अध्यापन पद्धतीचे फायदे पुढील प्रमाणे-

- शारिरीक क्षमतांचा विकस होतो.
- मानसिक ताणतणाव व्यवस्थापन कौशल्य विकास
- व्यक्तिमत्वाचा विकास
- नेतृत्व विकास
- सांघिक कौशल्य
- संकल्पना प्रत्यक्षपणे अनुभवता येतात.
- भूगोलातील अमूर्त संकल्पना समजण्यास मदत होते.
- अनुभवातून, प्रत्यक्ष अनुभूतीतून ज्ञानरचना होते.
- सहलीच्या माध्यमातुन समवयस्क आणि प्रौढांसोबत होणाऱ्या आंतरक्रियांचा विद्यार्थ्याच्या बोध प्रक्रियेवर प्रभाव पडतो.
- प्राप्त अनुभूतींमधून ज्ञानरचना होताना पंचज्ञानेंद्रियांनी घेतलेले वैयक्तिक अनुभव महत्वाचे असतात.
- अध्ययन अनुभूतींचा अर्थ देण्यातून संबंध साध्यता होते.
- ज्ञान हे गतिमान आहे.
- स्थानिक परिस्थिती व वैयक्तिक अनुभवांना ज्ञाननिर्मितीत महत्व आहे.

**अडथळे:**

- वर्षातुन एकदा किंवा दोनदाच सहलीचे आयोजन केले जाते.
- शैक्षणिक सहली संदर्भात शासकीय आदेशानुसार आवश्यक असलेल्या कागदपत्रांची जुळवाजुळव सहजतेने करणे शक्य होत नाही.
- संमतीपत्रे, हमीपत्रे, वैद्यकीय प्रमाणपत्रे इत्यादी अटींची पुर्तता होत नाही.
- नियोजन-आयोजन इत्यादी अधिकच्या जबाबदाऱ्या घेण्याची तयारी नसते.
- भूगोल विषयातील सर्वच घटकांचे सहल पद्धतीने अध्यापन करता येत नाही.
- वेळ-काळ व पैशांची मर्यादा असते.
- विद्यार्थ्याकडे वैयक्तिक लक्ष द्यावे लागते.

शिक्षणाचा अर्थ व्यक्तीच्या वर्तनामध्ये विधायक बदल घडून येणे असा आहे. शिक्षण हि एक प्रक्रिया आहे. ज्यामुळे बालकास भावी जीवन यशस्वीरितीने जगण्याची कला प्राप्त होते. योग्य संस्कार होवून त्याच्यामध्ये गुणांचा विकास होतो. त्यामुळे अध्यापनात विविध अध्यापन पद्धतींची आवश्यकता निर्माण झाली. त्यामुळे ज्ञान रचना, ज्ञानग्रहण प्रक्रिया सक्रिय होते. निश्चितच याचा समाधानकारक व सकारात्मक परिणाम पहावयास मिळतो.

विद्यार्थ्यांना ऐतिहासिक किल्ले, भौगोलिक परिसर, कोकणचा समुद्र, मनोरंजन स्थळे, बागबगीचे, प्राचीन स्थळे, लेण्या, थंड हवेची ठिकाणे,सायन्स पार्क इत्यादी ठिकाणांची प्रत्यक्ष माहिती विद्यार्थ्यांना देण्यासाठी शैक्षणिक सहली आयोजित करण्यात येतात. त्यामुळे त्या त्या विषयांची सखोल माहिती विद्यार्थ्यांना मिळते. त्याचबरोबर पालकांशिवाय प्रवासात स्वत:बरोबर सहकारी मित्रांची कशी काळजी घ्यावी या बाबींचे ज्ञान प्रत्यक्ष कृतीतुन देण्याचा प्रयत्न सहल अध्यापनातून होत असतो. लोकजीवनाचा प्रत्यक्ष अनुभव मिळतो. विविध ठिकाणे प्रत्यक्ष पाहून ज्ञानात, माहितीत भर पडते. शेतीचे विविध प्रकार, नद्या, तलाव, धबधबे, डोंगर, झाडे, उद्याने, पशु, पक्षी, वनस्पती इत्यादी अनेक बाबींच्या प्रत्यक्ष निरीक्षणातून विविध विषयांचे ज्ञान वाढीस लागते. शिक्षणात गुणवत्ता टिकविण्यासाठी केवळ एकाच अध्यापन पद्धतीचा वापर न करता विविध अध्यापन पद्धतींचा अवलंब केला पाहिजे.

**संदर्भ सूची:**

१. जगताप, ह.ना., (२००८), शैक्षणिक व प्रायोगिक मानसशास्त्र, पुणे: नित्यनूतन प्रकाशन.
२. कुंडले, म.बा., (नोव्हेंबर, २००३), शैक्षणिक तत्वज्ञान आणि शैक्षणिक समाजशास्त्र, पुणे: श्रीविद्या प्रकाशन.
३. पाटील, व्ही.एन. आणि चट्टे, (जानेवारी, २०१०), जीवन कौशल्यासाठी शिक्षण, शिक्षण संक्रमण अंक
४. पोंक्षे, द.बा., (जुलै, २००९), भूगोलाचे अध्यापन, पुणे: नित्यनूतन प्रकाशन.
५. बापट, भा.गो. (सप्टेंबर, २००७), भूगोल अध्ययन आणि अध्यापन, पुणे: व्हीनस प्रकाशन.